**CNRNOMHOS120002312017**

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०/२०१७**

**बिभीषण (मयत)तर्फे वारस व इतर विरुध्द शासन व इतर**

**निशाणी क्र. ८६ खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४, ७ व ११ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करून कैफियत दाखल करून घेण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. ४, ७ व ११ यांनी प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज पाहण्यासाठी विधिज्ञ ए.एस. पाटील यांची नेमणुक केली होती. तथापि, त्यांचे अपघाती निधन झाले. यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुत प्रकरणाची योग्य माहिती मिळाली नाही तसेच महत्वाची कागदपत्रे देखील प्राप्त झाली नाहीत. या सर्व कारणामुळे प्रतिवादी यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जाला हरकत घेतली आहे की, प्रस्तुत दावा हा पाच वर्षापेक्षा जास्त जुना आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा. तसेच अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीतजास्त खर्चाची रक्कम प्रतिवादी यांच्यावर लादुन मगच अर्ज मंजुर करावा.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखनाचे अवलोकन केले. दिनांक ११.०७.२०१८ रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द प्रकरण विनाकैफियत चालविण्यात यावे याबाबत आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये जी काही कारणे नमूद केली आहेत ती कारणे जवळपास पाच वर्षाच्या विलंबाला संयुक्तीक ठरत नाहीत. तथापि, अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा अजुनही मुद्दे काढण्याच्या टप्प्यावर आलेला नाही. दावा हा काही इतर प्रतिवादीबाबतीत त्यांचा समन्स अहवाल येणेवर प्रलंबीत आहे. याचा विचार करता, प्रस्तूत प्रकरणाचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करुन प्रस्तुत प्रतिवादीना त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचित ठरते. तथापि, प्रस्तुत प्रतिवादी यांनी जो काही विलंब केलेला आहे व त्या विलंबाबाबतीत कोणतेही संयुक्तीक कारण सादर केलेले नसल्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादी यांनी वादींना खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर मंजुर करणे

न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. ४, ७ व ११ यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश त्यांनी वादी यांना एकुण खर्चाची रक्कम रुपये ६००/- देण्याच्या अटीवर रद्यबातल करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ४, ७ व ११ यांनी सोसण्याचा आहे.

स्वा/-१६.१०.२०२४
( ए. पी. कुलकर्णी)
दिनांक – १६/१०/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, भूम.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. A.K. Pawar.,<br>Sr. Clerk |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 16/10/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 16/10/2024 |
| Order uploaded on | --- | 16/10/2024 |